महाराष्ट्र शासन, कृषि विभाग
विभागीय कृषि सहसंचालक, नाशिक यांचे कार्यालय, नाशिक रोड, नाशिक - ४२२१०१
दुरध्वनी क्र. : ०२५३- २९५७४८०/८१/८४/८५ ई-मेल- nskjda@gmail.com

***

# ई-निविदा सूचना

**OPEN COMPETITIVE PROCUREMENT (Two-Envelope Bidding Process With E-Procurement)**

- विभागीय कृषि सहसंचालक, नाशिक विभाग या कार्यालयात व अधिनस्त इतर संबंधित कृषि कार्यालयांत कंत्राटी तत्वावर विविध महत्वाकांक्षी योजनांच्या अंमल बजावणी साठी मानधन तत्वावर आवश्यक मनुष्यबळ पुरवठा करणे बाबत विभागीय कृषि सहसंचालक,नाशिक विभाग कार्यालयात व अधिनस्त इतर संबंधित कार्यालयांत ११ महिने कालावधी साठी कंत्राटी कर्मचारी पुरविणे बाबत निविदा धारकांकडून खालील नमुद केलेल्या अटी व शर्तींना अधिन राहून https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दिनांक १८.०५.२०२६ रोजी सायंकाळी ५.३० ते दि.०२.०६.२०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहेत. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १ | ई-निविदा फॉर्मची किंमत | रु. १०,००० /- (अक्षरी- रु. दहा हजार फक्त) ( Mahatender पोर्टलवर ऑनलाईन भरणा, Non Refundable) |
| २ | बयाणा रक्कम | रु. ३,००,००० /- (अक्षरी- रु. तीन लाख फक्त) (Mahatender पोर्टलवर ऑनलाईन भरणा) |
| ३ | अनामत रक्कम | यशस्वी निविदा काराला आदेशाच्या रक्कमेच्या 3 % |
| ४ | निविदा प्रसिद्धी दिनांक | दिनांक - १८.०५.२०२६. |
| ५ | निविदा भरुन अपलोड करण्यासाठीचा कालावधी | दिनांक १८.०५.२०२६ सायंकाळी ५.३० वाजेपासून ते दिनांक ०२.०६.२०२६ सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत. |
| ६ | तांत्रिक व लेखा बाबीं साठी संपर्क अधिकारी | श्री. किशोर पवार , लेखाधिकारी ०२५३ - २९५७४८० श्रीमती .आरती बोरस्ते , तंत्र अधिकारी |
| ७ | प्री-बीड मिटिंग व ठिकाण | दिनांक २६.०५.२०२६ सकाळी ११.३० वाजता प्रस्तुत कार्यालय येथे |
| ८ | तांत्रिक निविदा उघडण्याचा दिनांक व ठिकाण | दिनांक ०३.०६.२०२६ सांय. ०५.३० वाजता प्रस्तुत कार्यालय येथे. |
| ९ | ऑनलाईन पद्धतीने निविदा उघडण्याचे ठिकाण | विभागीय कृषि सहसंचालक, नाशिक विभाग, नाशिक पत्ता:- अश्विनी बॅरेक ,महसुल आयुक्त कार्यालया शेजारी,नाशिक रोड ४११००१ |
| १० | आर्थिक ई निविदा | तांत्रिक पडताळणी अंती पात्र निविदाधारकांची आर्थिक निविदा उघडण्यात येईल. |

(सुभाष काटकर)
विभागीय कृषी सहसंचालक
नाशिक विभाग नाशिक

महाराष्ट्र शासन, कृषि विभाग
विभागीय कृषि सहसंचालक, नाशिक यांचे कार्यालय, नाशिक रोड, नाशिक - ४२२१०१
दुरध्वनी क्र. : ०२५३- २९५७४८०/८१/८४/८५ ई-मेल- nskjda@gmail.com

*****************************************************************************************************

## ई-निविदा सूचना

१. विभागीय कृषि सहसंचालक, नाशिक विभाग या कार्यालयात व इतर अधिनस्त संबंधित कृषि कार्यालयांत कंत्राटी तत्वावर विविध महत्वाकांक्षी योजनांच्या अंमलबजावणीसाठी मानधन तत्वावर आवश्यक मनुष्यबळ पुरवठा करणे बाबत ई-निविदा प्रसिद्ध करण्यात येत आहे.

२. सदरची निविदा प्रक्रिया Open competitive procurement procedure व महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भाखस - २०१४ / प्र.क्र.८२ / भाग-३ / उद्योग-४ दि. ०१/१२/२०१६ अन्वये सूचनांच्या अधीन राबवण्यात येणार आहे.

३.निविदा दस्तऐवज https://mahatenders.gov.in वर ऑनलाईन उपलब्ध असून निविदा शुल्क ऑनलाईन स्वरूपात भरावे लागेल. इच्छुक निविदा धारकांना वेबसाईटवर नोंदणी करणे आवश्यक आहे. ( नोंदणी विना मूल्य आहे ). वेबसाइटवर उपलब्ध असलेले कोणतेही जोडपत्र / शुद्धिपत्रक देखील डाउनलोड आणि समाविष्ट केले आहे, याची खात्री करण्याची जबाबदारी इच्छुक निविदाधारकांची असेल.

४. निविदा सादर करण्यासाठी निविदाधारका कडे भारत सरकारने अधिकृत केलेल्या प्रमाणन अधिकाऱ्यांपैकी डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र (DSC) प्राप्त केले असणे आवश्यक आहे. या प्रकल्पात ई-प्रोक्योरमेंट मध्ये सहभागी होण्यासाठी वापरकर्ता आयडी आणि पासवर्ड मिळालेला नसलेले इच्छुक बोलीदार https://mahatenders.gov.in या वेबसाईट वरून ते मिळवू शकतात.

५. निविदा सादर करण्याच्या अंतिम तारखेला किंवा त्यापूर्वी https://mahatenders.gov.in वर ऑनलाईन निविदा सादर कराव्यात आणि निविदेचा 'तांत्रिक भाग' वर दिल्या प्रमाणे निविदा उघडण्या साठी निर्दिष्ट वेळेत आणि तारखेला ऑनलाईन उघडला जाईल. तदनंतर तांत्रिक ई-निविदातील पात्र / अपात्र निविदाकार अंतिम झाल्यानंतर वित्तीय / आर्थिक ई निविदा उघडण्यात येईल जर निर्दिष्ट केल्याप्रमाणे निविदा उघडण्याच्या तारखेला कार्यालय बंद असेल, तर निविदा पुढील कामकाजाच्या दिवशी त्याच वेळी उघडल्या जातील. इलेक्ट्रॉनिक निविदा प्रणाली विहित कालावधी नंतरच्या कोणत्याही निविदा सादर करण्यास परवानगी देणार नाही. सादर केल्या असल्यास ग्राहय धरण्यात येणार नाही

६. सर्व निविदा सोबत निविदा दस्तऐवजात नमूद केल्याप्रमाणे निविदा शुल्क व बयाना रक्कम भरणा असणे आवश्यक आहे.

७. उक्त घटकाबाबतचे इतर तपशील निविदा दस्तऐवजात पाहता येतील. ई-निविदा प्रणालीच्या नियंत्रणा बाहेरील बिघाडामुळे होणाऱ्या कोणत्याही विलंबासाठी हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. जरी ई-निविदा प्रणाली कोणत्याही निविदा धारकाला निविदा बदलाबद्दल सूचित करण्याचा प्रयत्न करेल, तरी निविदा धारकाला न मिळालेल्या कोणत्याही माहितीसाठी हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. या निविदे संदर्भात संबंधित नवीनतम माहितीसाठी वेबसाईट सत्यापित करणे ही निविदाधारकांची जबाबदारी आहे.

(SUBHASH KATKAR)
Divisional Joint Director of Agriculture
Nashik Division Nashik

महाराष्ट्र शासन, कृषि विभाग
विभागीय कृषि सहसंचालक, नाशिक यांचे कार्यालय, नाशिक रोड, नाशिक - ४२२१०१
दुरध्वनी क्र. : ०२५३- २९५७४८०/८१/८४/८५ ई-मेल- nskjda@gmail.com

*************************************************************************************

८. प्रशासकीय अथवा काही अपरिहार्य कारणास्तव निविदा उघडणे, छाननी करणे व अंतिम करून कार्यारंभ आदेश देण्याच्या तारखांमध्ये व इतर बाबींमध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार मा. विभागीय कृषी सहसंचालक, नाशिक विभाग यांच्याकडे राखून ठेवले आहेत.त्याचबरोबर,कोणत्याही क्षणी निविदा प्रक्रिया रद्द करण्याचा अथवा कंत्राटी कर्मचारी सेवा पुरवठादार संस्थेची मुदतपूर्व सेवा बंद करण्याबाबत अथवा मुदत संपल्यानंतर मुदतवाढ देण्याबाबत या संबंधिताचे सर्व अधिकार मा. विभागीय कृषी सहसंचालक, नाशिक विभाग,यांच्याकडे राखून ठेवण्यात येईल. याबाबतचे शुद्धीपत्रक वेळोवेळी महाटेंडर पोर्टल वर प्रसिद्ध करण्यात येईल. सदरील शुद्धीपत्रकांचे अवलोकन करण्याची जबाबदारी निविदाधारकांची असेल, याची नोंद घ्यावी.

( सुभाष काटकर )
विभागीय कृषी सहसंचालक,
नाशिक विभाग, नाशिक

महाराष्ट्र शासन, कृषि विभाग
विभागीय कृषि सहसंचालक, नाशिक यांचे कार्यालय, नाशिक रोड, नाशिक - ४२२१०१
दुरध्वनी क्र. : ०२५३- २९५७४८०/८१/८४/८५ ई-मेल- nskjda@gmail.com

# अनुक्रमणिका

I. निविदा धारकाने पूर्तता करावयाच्या बाबी (Tender Conditions)

I.A. अपलोड करावयाच्या कागदपत्रांची अनुक्रमणिका / सूची.

II.तांत्रिक व आर्थिक मूल्यांकन.

III. कंत्राटी तत्वावरील कर्मचारी विषयक अटी व मानधन.

IV. कंत्राट कालावधी.

V. निविदा विषयक प्रपत्रे / फॉर्म्स.

महाराष्ट्र शासन, कृषि विभाग
विभागीय कृषि सहसंचालक, नाशिक यांचे कार्यालय, नाशिक रोड, नाशिक - ४२२१०१
दुरध्वनी क्र. : ०२५३- २९५७४८०/८१/८४/८५ ई-मेल- nskjda@gmail.com

*****************************************************************************************

## २. निविदा धारकाने पूर्तता करावयाच्या बाबी

१. निविदाधारकाने ई-निविदा फॉर्म किंमत व बयाना रक्कम https://mahatenders.gov.in पोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने भरणे बंधनकारक राहील. तसेच महाराष्ट्र शासन उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भाखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-३/उद्योग-४ दि. ०१/१२/२०१६ अन्वये ज्यांना सूट देण्यात आलेली आहे. त्यांनी त्याबाबतची सर्व कागदपत्रे/ दस्तऐवज अपलोड करणे बंधनकारक आहे.

२. सर्व संबंधित कागदपत्रांच्या सत्यप्रती ( प्रमाणपत्रे व तांत्रिक दृष्टया पुरावा आवश्यक ) स्वंसाक्षांकित केलेली ( स्वाक्षरी-शिक्का सह अटेस्टेड ) कागदपत्रे https://mahatenders.gov.in वर अपलोड करणे बंधनकारक आहे.

३ . निविदा सादर करणारी प्लेसमेंट एजन्सी महाराष्ट्र राज्यातील नोंदणीकृत एजन्सी असावी व तिचे कार्यालय महाराष्ट्र स्थित असावे.

४ सदर कंत्राटी मनुष्यबळ सेवा पुरवठा संस्थेची सन २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ या आर्थिक वर्षांची उलाढाल सरासरी किमान रु. २,५०,००,०००/- (अक्षरी - दोन कोटी पन्नास लाख रु.) असावी. त्यांच्याकडे उपलब्ध मनुष्यबळाची वर्गवारी, पूर्वानुभव, कार्यक्षेत्र ( कार्यालय ) इ. बाबींसाठी प्राधान्य राहील. उलाढालीचा निश्चित तपशील वर्षामध्ये सनदी लेखापाल यांच्या सहीने साक्षांकित ( UDIN ) करून देण्यात यावा.

५. सदर मनुष्यबळ पुरवठा संस्थेचा किमान ५ वर्षाचा अनुभव असावा व सदर संस्थेने एका आर्थिक वर्षात शासकिय विभागांना किमान १०० तांत्रिक मनुष्यबळ पुरवठा केल्याचा अनुभव असावा.

५ . सदर प्लेसमेंट एजन्सीकडे राज्य शासनाकडील विभागांना मनुष्यबळ उपलब्ध केल्याचा पूर्वानुभव असावा. कृषी विभागास मनुष्यबळ पुरवठा करणाऱ्याएजन्सीला प्राधान्य देण्यात येईल. कंत्राटी मनुष्यबळ सेवा पुरवठा अनुभवाचा निश्चित तपशील वर्ष व महिन्यांमध्ये अनुक्रमणिकेतील विहित नमुन्यात साक्षांकित करून देण्यात यावा.

६ .तसेच संबंधित विभाग / कार्यालय यांच्याकडील स्वाक्षरीत काम 'समाधानकारक' पूर्ण केले असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करावे.

७ .उपरोक्त सर्व कागदपत्रांची पूर्तता करणाऱ्या पात्र निविदाधारकांचा आर्थिक लिफाफा क्रमांक ' २ ' (BOQ) उघडण्यात येईल.

८ .संबंधित संस्था ही खालीलप्रमाणे एका कायद्या खालील नोंदणीकृत असावी. (संस्था नोंदणी पत्राची नूतनीकरण केलेली अद्ययावत सत्यप्रत जोडणे आवश्यक)

- अ. मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम-१९४८ व उद्यम प्रमाणपत्र
- ब. भागीदारी संस्था अधिनियम १९६०
- क. सहकारी संस्था अधिनियम - १९६०
- ड. कंपनी अधिनियम - २०१३

९ . पॅन कार्ड, आयकर खात्याकडे नोंदणी केल्याच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत व सन २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे आयकर भरल्याचे विवरणपत्र / लेखापरीक्षण झालेला वार्षिक ताळेबंद, आयकर परतावा प्रमाणपत्र ( IT Return ), नफा-तोटा पत्रक सनदी लेखापाल यांच्या सहीची साक्षांकित प्रत सादर करणे.

१० . वस्तू व सेवा कर (GST) नोंदणी प्रमाणपत्र तसेच सन २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ या आर्थिक वर्षातील वस्तू व सेवा कर परतावा (GST Return) वार्षिक / त्रैमासिक / मासिक भरल्याची साक्षांकित प्रत.

११ .निविदाकार कंपनीकडे सद्यस्थितीत उपलब्ध असणाऱ्या कुशल / अकुशल मनुष्यबळाचा अहवाल साक्षांकित प्रत.

१२ . कर्मचारी भविष्य निर्वाह निधीचे नोंदणीकृत प्रमाणपत्र साक्षांकित प्रत.

१३ . राज्य कामगार विमा वर्गणीचे नोंदणीकृत प्रमाणपत्र साक्षांकित प्रत.

१४ . काळ्या यादीत नसल्याचे स्वयंघोषणा पत्र साक्षांकित प्रत.

१५ . निविदेतील "फॉर्म १" मधील माहितीत तसेच कंत्राटदाराची वैयक्तिक माहिती साक्षांकित प्रत.

१६ . मागील ३ महिन्यांमध्ये आपल्या स्तरावरून कर्मचाऱ्यांना अदा केलेल्या रक्कमेचे बँक तपशील साक्षांकित प्रत (बँक स्टेटमेंट).

१७ . महाराष्ट्र शासन उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भाखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-३ /उद्योग-४ दि. ०१/१२/२०१६ अन्वये सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

१८ .निविदा विषयक कोणत्याही प्रकारचा खुलासा मागवण्याचा तथा सत्यता पडताळणी करण्याचा हक्क हे कार्यालय राखून ठेवत आहे. प्राप्त खुलासा समाधानकारक नसल्यास सदरची निविदा नाकारण्यात येईल,याची नोंद घ्यावी.

१९ . निविदा सादर करण्याच्या अंतिम मुदतीपूर्वी कधीही, हे कार्यालय शुद्धिपत्रक जारी करून निविदा दस्तऐवजात सुधारणा करू शकतो. सदर शुद्धिपत्रक ई-निविदा प्रणालीवर "नवीनतम शुद्धिपत्रक" अंतर्गत दिसून येईल आणि ज्या निविदाकारांनी निविदा तयार करण्यास सुरुवात केली आहे, त्यांना ई मेल सूचना देखील ई-निविदा प्रणाली मार्फत स्वयंचलित पणे पाठवली जाईल.

२० . निविदा तयार करणे आणि सादर करणे यासंबंधीचा सर्व खर्च निविदा धारकाला करावा लागेल आणि हे कार्यालय त्या खर्चासाठी जबाबदार किंवा उत्तरदायी राहणार नाही.

२१ . निविदा तसेच निविदेशी संबंधित सर्व पत्रव्यवहार आणि कागदपत्रे मराठी / इंग्रजीमध्ये लिहिली जातील.

२२ . निविदाधारक फक्त भारतीय रुपयांमध्ये किंमत सादर करेल.

२३ . सदर निविदा १२० दिवसांच्या वैधता कालावधीसाठी वैध राहतील. निविदा वैधता कालावधी निविदा सादर करण्याच्या अंतिम तारखेसाठी निश्चित केलेल्या तारखेपासून सुरू होईल.कमी कालावधीसाठी वैध असलेली निविदा निविदाधारकाकडुन प्रतिसाद न देणारी म्हणून नाकारली जाईल.

२४ . निविदाधारक त्यांच्या दस्तामध्ये "गोपनीय" माहिती म्हणून चिन्हांकित करतील, जी त्यांच्या व्यवसायासाठी गोपनीय असेल.

२५ . निविदा दस्तावर संस्थेच्या वतीने स्वाक्षरी करण्यासाठी अधिकृत व्यक्तीने स्वाक्षरी केली पाहिजे.

२६ .निविदा दस्तात नमूद कागदपत्रांचा समावेश असलेली पूर्ण झालेली निविदा दस्त ई-निविदा पोर्टलवर अपलोड करावी तसेच निविदा दस्तऐवजातील वेगवेगळ्या विभागांमध्ये नमूद केलेल्या आवश्यक प्रमाणपत्रांच्या साक्षांकित व स्कॅन केलेल्या प्रती अपलोड कराव्यात.

२७ . निविदाधारकाने डिजिटल स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. इलेक्ट्रॉनिक ऑनलाईन निविदा सादर केल्यावर, ई-निविदा प्रणाली एक unique ओळख क्रमांक तयार करते. ज्यावर सर्व्हर वेळेनुसार निविदा सादर केल्याचा वेळ नमूद केला जातो. हा क्रमांक निविदा सादर केल्याची पावती मानली जाईल.

२८ . भौतिक, ई-मेल, टेलेक्स, केबल किंवा फॅक्सिमाइल द्वारे सादर केलेल्या निविदा स्विकारण्यात येणार नाही.

२९ . निविदा दस्तात नमूद केलेल्या अंतिम तारखेपूर्वी आणि वेळेपूर्वी ऑनलाईन अपलोड करणे आवश्यक आहे. हे कार्यालय निविदा दस्तात सुधारणा करून निविदा सादर करण्याची अंतिम मुदत वाढवू शकतो, अशा परिस्थितीत प्रस्तुत कार्यालय आणि निविदाधारकांचे पूर्वी अंतिम मुदतीच्या अधीन असलेले सर्व अधिकार आणि दायित्वे त्यानंतर

वाढवलेल्या अंतिम मुदतीच्या अधीन असतील. ई-टेंडर प्रणाली सर्व्हर वेळेनुसार देय तारीख आणि वेळेनंतर ई निविदा उशिरा सादर करण्याची परवानगी देणार नाही.

३० . प्रस्तुत कार्यालय अंतिम मुदतीपर्यंत प्राप्त झालेल्या सर्व निविदांचे तांत्रिक भाग निर्दिष्ट केलेल्या तारखेला आणि वेळेत सार्वजनिकपणे उघडेल आणि हे निविदा धारकांना ऑनलाईन देखील पाहता येईल. जोपर्यंत तांत्रिक भागांचे मूल्यांकन प्रसिद्ध होणार नाहीत, तोपर्यंत निविदांचे आर्थिक भाग ई-निविदा प्रणालीमध्ये उघडले जाणार नाहीत. सर्व निविदांमध्ये दस्तात नमूद अटी व शर्तीच्या अन्वये सादर केलेल्या कागदपत्रांची प्रथम छाननी केली जाईल आणि तरतुदींचे पालन न करणाऱ्या निविदा धारकांना "तांत्रिकदृष्ट्या अपात्र" घोषित केले जाईल आणि त्यांचे आर्थिक प्रस्ताव उघडले जाणार नाहीत.

३१ . निविदांचे मूल्यांकन आणि कंत्राट देण्याच्या शिफारशीशी संबंधित माहिती, निविदा धारकांना किंवा निविदा प्रक्रियेशी अधिकृतपणेसंबंधित नसलेल्या इतर कोणत्याही व्यक्तींना कंत्राट देण्याच्या उद्देशाची माहिती ( Award of Contract ) प्रसिद्ध होईपर्यंत उघड केली जाणार नाही.

३२ .तांत्रिक / आर्थिक मूल्यांकन किंवा कंत्राट देण्याच्या निर्णयांमध्ये या कार्यालयावर प्रभाव पाडण्याचा निविदाधारकांमार्फत कोणताही प्रयत्न झाल्यास सदर निविदा अपात्र घोषित करण्यात येईल.

३३ .निविदांची तपासणी, मूल्यांकन, तुलना आणि पात्रतेमध्ये मदत करण्यासाठी हे कार्यालय आवश्यकतेनुसार कोणत्याही निविदाधारकास त्याच्या निविदेबद्दल स्पष्टीकरण मागू शकतो. स्पष्टीकरणासाठी विनंती आणि प्रतिसाद लेखी स्वरूपात असेल.

३४ .या कार्यालयास स्पष्टीकरणासाठी केलेल्या विनंतीमध्ये निश्चित केलेल्या तारखेपर्यंत आणि वेळेपर्यंत निविदाधारकामार्फत स्पष्टीकरण प्राप्त न झाल्यास, तर त्याची निविदा नाकारली जाऊ शकते.

३५ . सदर कार्यालय कोणतीही निविदा स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा आणि निविदा प्रक्रिया रद्द करण्याचा आणि कंत्राट देण्यापूर्वी कधीही सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार राखून ठेवत आहे.

महाराष्ट्र शासन, कृषि विभाग
विभागीय कृषि सहसंचालक, नाशिक यांचे कार्यालय, नाशिक रोड, नाशिक - ४२२१०१
दुरध्वनी क्र. : ०२५३- २९५७४८०/८१/८४/८५ ई-मेल- nskjda@gmail.com

---

लिफाफा क्र.१ ( तांत्रिक )

१. निविदेतील **"फॉर्म १"** मधील माहिती तसेच कंत्राटदाराची वैयक्तिक माहिती साक्षांकित प्रत.

२. पॅन कार्ड ( PAN Card ).

३. संस्था नोंदणी पत्राची नूतनीकरण केलेली अद्ययावत सत्यप्रत:

- **अ.** मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम-१९४८ व उद्यम प्रमाणपत्र.
- **ब.** भागीदारी संस्था अधिनियम १९६०.
- **क.** सहकारी संस्था अधिनियम १९६०.
- **ड.** कंपनी अधिनियम - २०१३.

४. **कर्मचारी भविष्य निर्वाह निधीचे** (EPF) नोंदणीकृत प्रमाणपत्र साक्षांकित प्रत.मागील महिन्याच्या चलनाचे प्रतीसह

५. **राज्य कामगार विमा** ( ESIC ) वर्गणीचे नोंदणीकृत प्रमाणपत्र साक्षांकित प्रत.

६. सदर कंत्राटी मनुष्यबळ सेवा पुरवठा संस्थेची सन **२०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५** या आर्थिक वर्षांची **मनुष्यबळ पुरवठा केल्याबाबतची** उलाढाल (**सरासरी किमान २.५ कोटी** ). उलाढालीचा निश्चित तपशील वर्षामध्ये सनदी लेखापाल ( CA ) यांच्या सहीने साक्षांकित ( **UDIN सह** ) असावा.

७. आयकर खात्याकडे नोंदणी केल्याच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत व सन **२०२२-२३ २०२३-२४ व २०२४-२५** या आर्थिक वर्षाचे आयकर भरल्याचे विवरणपत्र / लेखापरीक्षण झालेला वार्षिक ताळेबंद, आयकर परतावा प्रमाणपत्र (IT Return).

८. नफा-तोटा पत्रक, सनदी लेखापाल (CA) यांच्या सहीची साक्षांकित प्रत.

९. वस्तू व सेवा कर (GST) नोंदणी प्रमाणपत्र.

१०. सन **२०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५** या आर्थिक वर्षातील वस्तू व सेवा कर परतावा (GST Return) वार्षिक / त्रैमासिक / मासिक भरल्याची साक्षांकित प्रत.

११. निविदाकार कंपनीकडे सद्यस्थितीत उपलब्ध असणाऱ्या कुशल / अकुशल मनुष्यबळाचा अहवाल साक्षांकित प्रत.

१२. मागील ३ महिन्यांमध्ये आपल्या स्तरावरून कर्मचाऱ्यांना अदा केलेल्या रक्कमेचे बँक तपशील साक्षांकित प्रत (बँक स्टेटमेंट).

१३. काळ्या यादीत नसल्याचे रु. ५०० च्या बॉड पेपरवर शपथपत्र.

१४. शासकीय विभागांमध्ये कंत्राटी मनुष्यबळ सेवा पुरवठा अनुभव प्रमाणपत्र व कार्यारंभ आदेश इत्यादी. शासकीय विभागांमध्ये कंत्राटी मनुष्यबल सेवा पुरवठा अनुभवाचा निश्चित तपशील वर्ष व महिन्यांमध्ये साक्षांकित करून खालील नमुन्यात सादर करावा: {अ.क्र., शासकीय विभाग, कार्यालय, कार्यारंभ आदेश क्र. व दिनांक, एकूण सेवा पुरवठा कालावधी (वर्ष व महिना) }.

१५. संबंधित विभाग / कार्यालय यांच्याकडील काम 'समाधानकारक' पूर्ण केले असल्याबाबतचे संबंधित विभाग / कार्यालय यांचे स्वाक्षरीने प्रमाणपत्र सादर करावे.

१६.निविदेतील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे रु. ५०० च्या बॉड पेपरवर शपथपत्र.

**टीप**-उपरोक्त प्रमाणे, तांत्रिक मूल्यमापनासाठी आवश्यक ज्या कागदपत्रांची मागणी केली आहे, तेवढीच साक्षांकित केलेली अद्ययावत नमूद वर्षाचीच कागदपत्रे क्रमवार पद्धतीने ' Mahatender portal वर अपलोड / सादर करावीत.

महाराष्ट्र शासन, कृषि विभाग
विभागीय कृषि सहसंचालक, नाशिक यांचे कार्यालय, नाशिक रोड, नाशिक – ४२२१०१
दुरध्वनी क्र. : ०२५३– २९५७४८०/८१/८४/८५ ई-मेल- nskjda@gmail.com

II. तांत्रिक व आर्थिक मूल्यांकन

१. तांत्रिक मूल्यमापनः

१) प्रत्येक निविदेच्या तांत्रिक भागांचे मूल्यांकन करताना प्रस्तुत कार्यालयामार्फत पात्रता निकषांमध्ये सूचीबद्ध निकष आणि पद्धतीचा वापर करण्यात येईल.

२) Rated Criteria: किमान पात्रता अटी पूर्तता केल्याबाबत सर्व निविदाधारकाने सादर केलेल्या कागदपत्रांचे आधारे प्रथम तांत्रिक मूल्यमापन करून तांत्रिकदृष्ट्या पात्र / अपात्र ठरविण्यात येईल. तद्नंतर तांत्रिक ई-निविदेतील पात्र निविदाकार अंतिम झाल्यानंतर वित्तीय / आर्थिक ई-निविदा उघडण्यात येईल.

३) आर्थिक निविदा उघडल्यानंतर सर्वात कमी सेवाशुल्क दर असणाऱ्या (L१) यांची अंतिम निवड करण्यात येईल.

**SELECTION PROCEDURE**

पात्र निविदा धारकांचे किमान सेवा शुल्क (एल-१) दर समान असल्यास खालील क्रमानुसार नमुद निकषाद्वारे अंतिम निविदाधारक पात्र करण्यात येईल.

४) कृषी विभागात सेवा पुरवठा केल्याचा सर्वाधिक कालावधीचा सेवापुरवठा केल्याचा अनुभव असणाऱ्याची अंतिम निवड करण्यात येईल.

५) उपरोक्त १ मध्ये नमुद निकषानुसार एकापेक्षा जास्त सेवापुरवठादार पात्र ठरल्यास, कृषी विभागात सर्वाधिक तांत्रिक मनुष्यबळ पुरवठा केल्याचा अनुभव ( मागील ५ वर्षापैकी कोणत्याही एका वर्षात) असणाऱ्याची अंतिम निवड करण्यात येईल.

६) उपरोक्त निकष १ व २ मध्ये एकापेक्षा जास्त सेवापुरवठादार पात्र ठरल्यास, नाशिक विभागामध्ये सर्वाधिक कालावधी सेवा देण्याचा अनुभव असणाऱ्या सेवापुरवठादाराची अंतिम निवड करण्यात येईल.

महाराष्ट्र शासन, कृषि विभाग
विभागीय कृषि सहसंचालक, नाशिक यांचे कार्यालय, नाशिक रोड, नाशिक - ४२२१०१
दुरध्वनी क्र. : ०२५३- २९५७४८०/८१/८४/८५ ई-मेल- nskjda@gmail.com

***************************************************************************************************

## III. कंत्राटी तत्वावरील कर्मचारी विषयक अटी व मानधन

१. कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचारी जो स्वतःच्या निर्णय क्षमतेनुसार प्रामाणिकपणे, कार्यक्षमतेने व जबाबदारीने आपले कर्तव्य पार पाडू शकतो असा कर्मचारी हवा. अकुशल कंत्राटी कर्मचारी ज्यास लहानसा किंवा स्वतंत्र निर्णय घेणे आणि पूर्वानुभव असणे आवश्यक नाही, परंतु, तरीही व्यावहारिक परिस्थितीची माहिंती असणे आवश्यक आहे. असे साध्या कर्तव्यपालनाचा अंतर्भाव असलेला काम करणारा कर्मचारी हवा.

२. कंत्राटी कर्मचाऱ्याची वयोमर्यादा शासन निर्णयानुसार असावी. कंत्राटी कर्मचारी सशक्त असावा. तो गुन्हेगारी वृत्तीचा नसावा किंवा त्याच्यावर कोणत्याही फौजदारी / दिवाणी स्वरूपाच्या गुन्ह्यात शिक्षा झालेली नसावी किंवा त्यांच्यावर कोणत्याही फौजदारी किंवा दिवाणी स्वरूपाचा गुन्हा दाखल झालेला नसावा. याबाबत चारित्र्य पडताळणी दाखल्याच्या प्रतीची संबंधित कंत्राटदार संस्थेने खात्री करावी.

३. कंत्राटी कर्मचाऱ्याची कामाची वेळ सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ पर्यंत राहील. कंत्राटी शिपाई साठी सकाळी ९.३० ते ६.३० ही कामाची वेळ राहील. यामध्ये, नियंत्रण अधिकारी आवश्यकतेनुसार निर्णय घेतील.

४. शासन निर्णय दि. २२/०२/२०१९ उद्योग, ऊर्जा व कामगार विभागानुसार नमूद अटी व शर्ती, सूचना अन्वये मानधन अदा करणे बंधनकारकराहील. महाराष्ट्र शासन उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय भाखस-२०१४ / प्रक्र ८२ / भाग-३ / उद्योग-४ दि. ०१/१२/२०१६ मधील आवश्यक त्या अटी व शर्ती लागू राहतील.

५. कंत्राटदाराने आवेदन पत्रावर त्याचा फोटो, कायमचा पत्ता व पार्टनरशिप फर्म असल्यास कार्यालयीन पत्ता व वैयक्तिक पत्ते द्यावेत.

६. इपीएफ(EPF), इएसआयसी (ESIC), पीटी (PT), जी.एस.टी (GST), सेवा शुल्क व इतर कर यांची नियमाप्रमाणे आवश्यकते नुसार कंत्राटी पद निहाय एकसमान कपात करून केंद्र / राज्य शासनाच्या संबंधित विभागांना नियमितपणे भरणा करण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटी मनुष्यबळ पुरवठा संस्थेची राहील. कामगार कायद्याप्रमाणे, कंत्राटी तत्वावर पुरविलेल्या कर्मचाऱ्यांचे/ कामगारांचे नावे जमा करावयाच्या कर्मचारी भविष्य निर्वाह निधी / व्यवसाय कर / राज्य कामगार विमा वर्गणी / कामगार कल्याण वर्गणी / कामगार भरपाई कायद्यानुसार (Workmen's Compensation Act) विमा पॉलिसी रक्कम, वस्तू व सेवा कर व इतर बंधनकारक शासकीय रकमा / वजाती किंवा कर दरमहा अथवा त्रैमासिक भरणा केल्याच्या चलनाची / पावतीची प्रमाणित प्रती, पगार पत्रक / हजेरी पत्रकाची (Muster Roll Cum Wage Register) प्रमाणित प्रत सादर करणे आवश्यक आहे. प्रमाणित प्रत व इतर माहिती नियमितपणे देयकासोबत संबंधित कार्यालयास व एकत्रितपणे विभागीय कृषी सहसंचालक, नाशिक विभाग कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे.

७. कंत्राटी मनुष्यबळ पुरवठादार संस्थेने नियुक्त केलेल्या सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांचे EPF क्रमांक, ESIC क्रमांक तसेच MLW / LIN क्रमांक इ. संबंधित कर्मचाऱ्यांस व कार्यालयास कळविणे बंधनकारक राहील.

८. कंत्राटी मनुष्यबळ पुरवठादार संस्थेने कंत्राटी कर्मचाऱ्यांचे नियुक्ती आदेश तसेच मानधन देयके यामध्ये संबंधित योजनेचा उल्लेख करावा.

९. कंत्राटदार संस्थेने कंत्राटी कर्मचारी पुरवठा केलेल्या कार्यालयांकडून हजेरी अहवाल महिना अखेरपर्यंत प्राप्त करून घेऊन अचूक व रंगीत मानधन देयके विहित वेळेत सादर करावीत. मानधन देयकांची मूळ हार्ड कॉपी प्रत संबंधित कार्यालयांस विहित वेळेत प्राप्त न झाल्यास देयके कोषागारात सादर करण्यास विलंब होतो.त्यामुळे,

विहित वेळेत अनुदान खर्च होत नाही तसेच संस्थेसही मानधन अदा करण्यास अडथळा येतो. त्यामुळे, सदर देयके प्रत्येक महिन्याच्या ०५ तारखेपर्यंत संबंधित सर्व कार्यालयांस सादर करणे बंधनकारक आहे.

१०. विभागीय कृषी सहसंचालक, नाशिक या कार्यालयास व इतर संबंधित कार्यालयांस ज्या ज्या वेळी कंत्राटी कर्मचाऱ्यांची आवश्यकता भासेल,त्यानुसार अगोदर किंवा तातडीने कंत्राटदार संस्थेस कळविण्यात येईल. त्याप्रमाणे, मागणी प्राप्त होताच कंत्राटी कर्मचाऱ्यांचा तातडीने / विनाविलंब पुरवठा करावा लागेल. मनुष्यबळ सेवा पुरवठादार / ठेकेदाराकडून शैक्षणिक अर्हता व अनुभव तसेच योजनेतील इतर निकषांनुसार आवश्यक असणारे मनुष्यबळ पुरविण्यात यावे. आवश्यक संख्येपेक्षा कमी मनुष्यबळ उपलब्ध करून दिल्यास पर्यायी व्यवस्थेसाठी शासनास जो काही खर्च येईल, ती रक्कम मा. विभागीय कृषी सहसंचालक नाशिक कंत्राटी मनुष्यबळ सेवा पुरवठादार संस्थेकडून वसूल करतील.

११. कंत्राटदार संस्थेने विभागीय कृषी सहसंचालक, नाशिक विभाग कार्यालयांकडे पाठविलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या नावाची यादी,संपूर्ण पत्ता,मोबाईल नंबरसह द्यावी लागेल व त्याची प्रत संबंधित कार्यालयाकडे वेळोवेळी सादर करावी लागेल.

१२. कंत्राटदार संस्थेने संस्थेच्या नावाने प्रत्येक कंत्राटी कर्मचाऱ्याला फोटो असलेले ओळखपत्र सही करून देणे बंधनकारक राहील. तसेच सदर ओळखपत्र दररोज लावण्याबाबतच्या सूचना कर्मचाऱ्यांना द्याव्या लागतील.

१३. कंत्राटी कर्मचाऱ्यांवर नियंत्रण व देखरेख, रजा, हजेरी रजिस्टर ठेवण्याची जबाबदारी कंत्राटदार संस्थेची राहील.

१४. कृषी विभागाच्या कार्यालयीन वेळेत कंत्राटी कर्मचाऱ्याकडून कृषी विभागाचे नुकसान झाल्यास अथवा कंत्राटी कर्मचाऱ्यास दुखापत / आजार झाल्यास किंवा मृत्यू आल्यास, त्याच्या भरपाईची संपूर्ण जबाबदारी ही कंत्राटदार संस्थेची राहील. कंत्राटदाराला तसे रु. ५००/- च्या स्टॅम्प पेपरवर नमूद करून विभागीय कृषी सहसंचालक, नाशिक विभाग कार्यालयाकडे सादर करावे लागेल.

१५. कंत्राटदार संस्थेने पुरविलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वर्तन व चारित्र्य गोपनीय कामाच्या दृष्टीने हानिकारक आहे, असे कार्यालयाच्या निर्देशनास आल्यास कंत्राटदार संस्थेस कोणतीही पूर्वसूचना न देता कर्मचाऱ्यास तात्काळ कमी करण्यात येईल. कंत्राटी कर्मचाऱ्याच्या बदलाबाबतची त्यांची काही तक्रार असल्यास कर्मचाऱ्यांनी ती परस्पर कंत्राटदार संस्थेकडे करावी लागेल.

१६. शासकीय कामकाजाच्या आवश्यकतेनुसार संबंधित कंत्राटी कर्मचारी यांना कमी करण्याचे अधिकार संबंधित कार्यालय प्रमुखांना राहतील.

१७. वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने त्यांच्या पत्र क्रमांक ३१/१४/१०००/२०१४-GA दिनांक १७.९.२०१७ अन्वये केंद्र/राज्य सरकारच्या (लागू असेल त्याप्रमाणे) किमान वेतनापेक्षा जास्त दराने निविदा सादर करणाऱ्याने देऊ केलेले सेवा शुल्क/प्रशासकीय शुल्क हे शून्य टक्क्यांपेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. तसेच, शून्य टक्क्यांमध्ये ०.९९९९ पर्यंतच्या आणि त्यापुढील शून्याच्या सर्व व्युत्पन्न संख्यांचा समावेश आहे. वरील मार्गदर्शक तत्त्वांचे पालन न करणारे कोणतेही सेवा शुल्क असंवेदनशील मानले जाईल आणि अशा निविदा अपात्र होतील. सबब उक्त नमूद बाबीप्रमाणे, ० ते ०.९९९९ टक्क्यांपर्यंतचे किंवा उणे (-) सेवा शुल्काचा दर मान्य केला जाणार नाही. सदर परिस्थितीत निविदाधारकास आर्थिक मूल्यांकनात अपात्र घोषित करण्यात येईल. सबब **BOQ मध्ये सेवा शुल्काची टक्केवारी किमान १% किंवा त्यापेक्षा अधिक नमूद करणे बंधनकारक राहील.**

सादर केलेल्या सर्व्हिस चार्जच्या दरांमध्ये वाटाघाटी ( Negotiations ) करून ते कमी करण्याचे सर्व अधिकार विभागीय कृषी सहसंचालक, नाशिक विभाग, नाशिक यांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत.**योग्य संस्था निवडण्याचा पूर्ण** अधिकार मा.विभागीय कृषी सहसंचालक,नाशिक यांना राहील. समान दराविषयी अनुसरावयाची कार्यपद्धती व

अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार यावर कोणतेही आक्षेप घेता येणार नाहीत. ई-निविदांमध्ये नमूद केलेल्या तसेच या आदेशानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या अटी व शर्तीचे पालन करणे कंत्राटी मनुष्यबळ सेवा पुरवठादार संस्थेस बंधनकारक राहील.

१८. निवड झालेल्या कंत्राटदार संस्थेने विभागीय कृषी सहसंचालक,नाशिक विभाग कार्यालयाबरोबर केलेला करार न पाळल्यास, कराव्या लागणाऱ्या पर्यायी व्यवस्थेच्या खर्चाची तसेच कृषी विभागाच्या नुकसानाची भरपाई ठेकेदारास द्यावी लागेल.मनुष्यबळ सेवा पुरवठादार / ठेकेदारास स्वेच्छेने अथवा इतर कारणासाठी अचानकपणे कंत्राट रद्द करता येणार नाही. असे करावयाचे असल्यास **किमान ६० दिवस अगोदर** विहित नोटीसद्वारे मा. विभागीय कृषी सहसंचालक, नाशिक यांना कळविणे आवश्यक आहे. याचे पालन न झाल्यास अशा परिस्थितीत कराराचा भंग केल्याप्रकरणी संबंधित कंत्राटी मनुष्यबळ पुरवठादार संस्थेची **अमानत रक्कम** (Security Deposit) **जप्त करण्यात येईल** तसेच दुसरी पर्यायी सोय होण्यासाठी इतर ठेकेदारास कंत्राट देईपर्यंत येणाऱ्या खर्चाची व इतर बाकी असल्यास त्याची वसुली संबंधित कंत्राटदाराकडून करण्यात येईल व आवश्यकते नुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

१९. कंत्राटदार संस्थेस सदर कंत्राट अन्य कंत्राटदारास अंशतः किंवा पूर्णतः हस्तांतरित करता येणार नाही, तसे झाल्यास सदर कंत्राट संपुष्टात येईल.

२०. कंत्राटी मनुष्यबळ सेवा पुरवठादार संस्थेकडून नियुक्त केलेले कंत्राटी कर्मचारी / कामगार हे पूर्णपणे संबंधित संस्थेचे राहतील. त्यांचा शासकीय सेवेशी कोणताही संबंध असणार नाही. तसेच त्यांना शासनाकडून या सेवा नियमित करण्याबाबत कोणताही हक्क सांगता येणार नाही. याची मनुष्यबळ सेवा पुरवठादार संस्थेने संबंधित कंत्राटी कर्मचाऱ्यांना लेखी स्वरूपात कल्पना देणे व याबाबत त्यांची लेखी संमती घेणे बंधनकारक राहील. सलग सेवा कालावधी होऊ नये, यासाठी ठराविक महिन्यांनंतर आवश्यक तेथे एक दिवसाचा तांत्रिक खंड देण्याची जबाबदारी कंत्राटदार संस्थेची राहील.कराराप्रमाणे काम संपल्यानंतर, अशा प्रकारचे काम पुन्हा करण्यासाठी पूर्वीच्या मान्य कंत्राटदाराबरोबर करार झाल्यास, पूर्वीच्या करारानुसार मागील कालावधीत काम केलेले पूर्वीचेच कंत्राटी कर्मचारी पुन्हा पुरविल्यास कंत्राटदार यांना व कर्मचाऱ्यांना अखंड सेवांबाबत विभागीय कृषी सहसंचालक, नाशिक विभाग कार्यालयांविरुद्ध कोणतेही अधिकार किंवा दावा न्यायालयात प्रविष्ठ करता येणार नाही, असे कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून कंत्राटदार संस्थेने तसे लेखी घेऊन ते विभागीय कृषी सहसंचालक, नाशिक कार्यालयाकडे सादर करावे. कोणत्याही प्रकारचे कायदेशीर प्रकरण उद्भवल्यास नाशिक येथील न्यायालयाच्या कक्षेतच चालेल, याची कंत्राटदार संस्थेने नोंद घ्यावी. भविष्यात करार तत्त्वावरील कंत्राटी पद्धतीने मनुष्यबळ सेवा पुरवठा बाबत, मानधन अदायगी बाबत किंवा कोणतीही तक्रार, तांत्रिक / कायदेशीर बाब उद्भवल्यास त्याचे निराकरण करण्याची ज्या त्या कार्यालयाची व सेवा पुरवठादार संस्था यांची जबाबदारी राहील.

२१. निविदाधारकाने ई-निविदा फॉर्म किंमत व बयाणा रक्कम https://mahatenders.gov.in पोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने भरणे बंधनकारक राहील. तसेच उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय दि. ०१/१२/२०१६ अन्वये ज्यांना सूट देण्यात आली आहे, त्यांनी त्याबाबतची सर्व कागदपत्रे / दस्तऐवज अपलोड करणे बंधनकारक आहे. निविदाधारकास बयाणा व सुरक्षा रक्कमेबाबत निविदेत नमूद केलेल्या अटी व शर्तीप्रमाणे कार्यवाही करावी लागेल.

२२. कामगार कायद्याप्रमाणे, कंत्राटी तत्त्वावर पुरविलेल्या कर्मचाऱ्यांचे/ कामगारांचे नावे जमा करावयाच्या रकमा तसेच शासकीय रकमा / वजाती किंवा कर दरमहा अथवा त्रैमासिक भरणा केलेल्या चलनाची प्रमाणित प्रतींची तपासणी व पडताळणी संबंधित कार्यालयाकडून झाल्यानंतर संबंधित मनुष्यबळ सेवा पुरवठादारास अनुदान उपलब्धतेनुसार देयक अदा करण्यात येईल.कंत्राटदार संस्थेस अदा करावयाची रक्कम रोखून ठेवण्याचा अधिकार

प्रशासनास राहील व याबाबत कार्यालय प्रमुख यांचा निर्णय अंतिम राहील. अशा प्रकारे रोखून ठेवलेल्या रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज देण्यात येणार नाही.

२३. केंद्र शासन व राज्य शासनाच्या विविध योजनेंतर्गत विस्तार विषयक तांत्रिक व प्रशासकीय पदे ही कृषी विस्ताराशी निगडीत असल्याने वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या शासकीय नियम, शासन निर्णय, मार्गदर्शक सूचनेनुसार विविध लागू होणाऱ्या करांचा ( आयकर, व्यवसाय कर, वस्तू व सेवा कर इ.) मानधनातच समावेश राहील.

२४. शासनाच्या नियमाप्रमाणे वेळोवेळी वस्तू व सेवा कर व इतर कर कमी-जास्त झाल्यास ते संबंधित कार्यालयात भरणे आवश्यक असून त्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदार संस्थेवर राहील. यासंबंधी कागदपत्रे मागणी केल्यास ती सादर करणे कंत्राटदार संस्थेवर बंधनकारक राहील.

२५. कंत्राटी कर्मचाऱ्यांना मंजूर मानधनाची अदायगी कंत्राटदार संस्थेने NEFT / RTGS पद्धतीने करणे अनिवार्य आहे.

२६. संस्थेस प्राप्त उपस्थिती अहवालानुसार, आवश्यक बंधनकारक वजावटी करून कोणत्याही परिस्थितीत पदनिहाय निश्चित केल्याप्रमाणे एकसमान पद्धतीने उर्वरित मानधनाची अदायगी प्रत्येक महिन्याच्या दिनांक ०५ तारखेपर्यंतकरणे बंधनकारक आहे.

२७. कंत्राटी मनुष्यबळ पुरवठादार संस्थेने पुरवठा केलेल्या संबंधित कार्यालयांकडून कर्मचारी निहाय महिना निहाय अदायगी केलेल्या / प्राप्त झालेल्या मानधनाच्या तपशील विषयी आवश्यक ती माहिती वेळोवेळी प्राप्त करून घ्यावी.

२८. कंत्राटदार संस्थेने कंत्राटी मनुष्यबळास दोन महिन्यांचे मानधन / वेतन अग्रीम (Advance) स्वरूपात देय राहील.

२९. सदर कर्मचारी यांचा व्यवसाय कर (Professional tax) भरल्याबाबतची माहिती दर महिन्याला संबंधित कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे. तसेच आवश्यकता / मागणीनुसार Salary Slip कंत्राटी मनुष्यबळास दयावी लागेल.

